# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
# ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
# कार्यपत्रिका क्र. ४
# सभावृत्तांत

दिनांक :- ०७/६/२०१६ वेळ :- दु. १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ०७/०६/२०१६ रोजी दु. १२.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | अध्यक्षा |
| २. | मा.शमीम पठाण | |
| ३. | मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | |
| ४. | मा.को-हाळे अनंत सुभाष | |
| ५. | मा.विमलताई जगताप | |
| ६. | मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा | |
| ७. | मा.झामाबाई बाळासाहेब बारणे | |
| ८. | मा.माया संतोष बारणे | |
| ९. | मा..पवार यमुनाताई रमणनाना | |
| १०. | मा.गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश | |
| ११. | मा.स्वाती मयुर कलाटे | |
| १२. | मा.शरद माणिकचंद लुणावत | स्वीकृत सदस्य |
| १३. | मा.गोरक्ष दशरथ पाषाणकर | स्वीकृत सदस्य |

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.सुभाष माछरे – क्षेत्रिय अधिकारी ,मा.रविंद्र जाधव प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा..रामदास तांबे – कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग , मा.किशोरी नलावडे – वैदयकिय अधिकारी , वैदयकिय विभाग थेरगांव, मा.फल्ले विदयाधर – वैदयकिय अधिकारी तालेरा रुग्णालय , चिंचवड मा.सी.एन.धानोरकर – उपअभियंता, स्थापत्य , मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य, मा.एन.आर. निंबाळकर – उपअभियंता स्थापत्य, मा.संध्या वाघ, उपअभियंता , स्थापत्य, मा.राजेंद्र डुंबरे – उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.एन.आर.रोहिला – बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, मा.एम.एम.इनामदार, लेखाधिकारी , ब क्षेत्रीय कार्यालय , मा.के.डी.दरवडे , सहा.आरोग्याधिकारी, श्री.व्ही.बी.नेमाणे – कार्यालयीन अधिक्षक तथा अतिक्रमण प्रमुख ब क्षेत्रीय कार्यालय , मा.एस.के.माळी – आरोग्य निरिक्षक , पशुवैदयकिय विभाग, मा.गणेश देशपांडे, मुख्य आरोग्य निरिक्षक इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. १३, दि. १६/३/२०१६ रोजीचा सभावृत्तांत व कार्यपत्रिका क्रमांक ३, दिनांक १२/५/२०१६ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

तदनंतर **उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.४. श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकातून तालेरा हॉस्पीटलकडे जाणा-या रस्त्यावर सात गल्ल्या असून, त्या गल्ल्यांना गल्ली क्र.१, गल्ली क्र.२ या पध्दतीने क्रमांक देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा. अनंत को-हाळे यांचा प्रस्ताव .

विषय क्र.५ औध – रावेत बीआरटी मार्गावरील काळेवाडी फाटा येथील श्री नानासाहेब धर्माधिकारी पुलाखाली दैनंदिन व्यवहारासाठी नागरीकांची खुप वर्दळ चालु असते. परंतु सदर ठिकाणी मुतारीची गैरसोय असून, नागरीकांच्या सोयीसाठी सदर पुलाखाली स्त्रीया व पुरुषासाठी स्वच्छतागृह मुतारी बांधणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.विमल जगताप यांचा प्रस्ताव..

विषय क्र.६ चिंचवड श्री मोरया गोसावी मंदिरालगत पर्यटन विकास आराखडा अंतर्गत सुशोभीकरणाचे काम सुरु आहे व ते अंतिम टप्यामध्ये आहे. याठिकाणी रस्त्यामध्ये दोन स्वच्छतागृहे (दोन मुतारी फायबर) आहेत त्यांची दुर्गंधी मुळे रस्त्यांना ये जा करणा-यांना त्रास सहन करावा लागतो. नागरीकांच्या तक्रारी देखील आहेत. तरी मुतारी काढून टाकून त्या शेजारील पंपिंग स्टेशन येथे स्थलांतरीत करुन महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहे बांधण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा चिंचवड येथे संगित वर्ग चिंचवड शाखा या नावाने शास्त्रोक्त गायन हर्मोनियम व तबला यांचा वर्ग चालतो तरी या संगीत वर्गास पंडीत पदमाकर कुलकर्णी संगीत वर्ग चिंचवड असे नांव देण्यात यावे व कला क्षेत्रातील अभ्यासक व मान्यवरांची आहे. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अश्विनी चिंचवडेपाटील यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८ दि.१६/३/२०१६ रोजी ठराव क्रमांक ९२, मध्ये चिंचवडेनगर येथील दगडोबा चौकाच्या पुढील व संकल्प गार्डन चौकाच्या खालील बाजुस कै.तुकाराम बाळाजी चिंचवडेनगर (पाटील) चौक असे नामकरणाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर ठरावात कै.तुकाराम बाळाजी चिंचवडे (पाटील) ऐवजी कै.तुकाराम बाळाजी चिंचवडे (पोलीस पाटील) अशी दुरुस्ती करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विंचार करणे मा.शमीम पठाण यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९ पिंपरी चिंचवड शहरात अतिशय मोजके STP प्लॉन्ट कार्यान्वित आहेत. वाकड आणि आजुबाजुच्या भागात एकही STP प्लॉन्ट नाही. सदयस्थितीला थेरगांव, ताथवडे, वाकड या भागातील सर्व सांडपाणी प्रभागातील मुळा नदीत सोडले जाते. त्यामुळे प्रदुषणाचा ही धोका उदभवतो आहे. मुळा नदी वाकड गावापासून औंध पर्यंत सध्यातरी तिचे नैसर्गिक सौदर्य जपुन आहे. वाकड प्रभाग हा क्षेत्रफळाने मोठा असून येणा-या काळात त्याची लोकसंख्याही झपाटयाने वाढत जाणार आहे. हया सर्व बाबींचा विचार करुन आम्ही आमच्या कुटूंबातील सर्व्हे नं.२६५/२/३/४ मधील १ एकर ४ गुंठे जागा नदी किनारी उपलब् ध करुन देण्यास तयार आहोत व या जागेवर STP प्लॉन्ट उभा करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सौ.स्वाती कलाटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१० प्रभाग क्रमांक २१ मधील अन्नपुर्णा हॉटेल ते चाफेकर चौकाकडे जाणा-या रस्त्यास साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे मार्ग असे नामकरण करणस तसेच सदर नावाचा बोर्ड अन्नपुर्णा हॉटेलच्या जवळ लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.शमीम पठाण यांचा

ठराव क्र. ९ — विषय क्र. १
दिनांक ७/६/२०१६ — विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.शमीम पठाण — अनुमोदक: मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा

संदर्भ :- मा.झामाबाई बारणे यांचा १७/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव

थेरगांव येथील स.नं.२२/५ मधील क्षेत्र १ हेक्टर ०० आर या मिळकतीचा आगाऊ ताबा पिंपरी चिंचवड मनपास अ, ब पत्राव्दारे ज्या जमीन मालकाच्या मालकीची जमीन त्यांनी आरक्षण क्रमांक ६२८ खेळाचे मैदानसाठी दिलेले आहे. सदर खेळाचे मैदानास कै.रामभाऊ मोरु बारणे व कै.बारकु मोरु बारणे असे नांव देवून नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक १ चा विचार पुढील महिन्याच्या करणेत यावा.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १० — विषय क्र. २
दिनांक ७/६/२०१६ — विभाग – . मनपा वाहतुक विभाग
सुचक : मा.अनंत को-हाळे — अनुमोदक: मा. विनायक गायकवाड

संदर्भ :- मा.अनंत को-हाळे यांचा दिनांक १२/५/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड पिंपरी लिंकरोडवर हेरीटेज प्लॉझा ते ब प्रभाग कार्यालय मेन गेट पर्यंत चार चाकी व दोन चाकी गाडयांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून, नागरीकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तसेच अपघाताचे प्रमाण वाढले आहे तरी त्या रस्त्याचे दोन्ही बाजूस नो पार्किंग झोन करावा किंवा सम विषम तारखेस पार्किंगची आखणी करावी व त्यास प्रशासकीय मान्यता देवून वाहतुक विभागास सुचना करण्याकामीचा विषय रदद करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ११ विषय क्र. ३
दि. ७/६/२०१६ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय व बीआरटीएस विभाग

सुचक : मा.शमीम पठाण अनुमोदक: मा. विमलताई जगताप

संदर्भ :- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.बक्षे/सभा/२/कावि/२३६/२०१६, दिनांक ४/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५१ बेलठिकानगरमधील लक्ष्मणनगर येथील (गुजरनगर / गणेशनगर) सबवेस मा.प्रभाग समिती ठराव क्र.६, दिनांक १८/६/२०१४, अन्वये कै.नागुभ्राऊ गतिराम बारणे असे नामकरण करणेचा ठराव मंजूर करणेत आला होता. सदर ठराव रदद करुन समिती ठराव क्र.२९, दि.३०/१/२०१५, अन्वये कै.नागुभाऊ गतिराम बारणे असा मंजूर करणेत आलेला ठराव (ठराव क्र.६, दिनांक १८/६/२०१४,) रदद करुन सदर सबवेला कै.नरहरी नामदेव गुजर, गुजरनगर थेरगांव असे नामकरण करणेस मान्यता देणेत आलेली आहे. तदनंतर ठराव क्र.९, दि.१७/६/२०१५ नुसार सदर सबवेस कै.नरहरीनामदेव गुजर , गुजरनगर थेरगांव असा ठराव (ठराव क्र.२९, दि.३०/१/२०१५,) मंजूर करणेत आला होता. त्याचबरोबर त्या सबवेचे कै.पंडीत तुकाराम गुजर, गुजरनगर थेरगांव असे नामकरण करणेस मान्यता आहे. त्याप्रमाणे मनपा संबंधीत विभाग मा.कार्यकारी अभियंता स्थापत्य बीआरटीएस यांना पत्र क्रमांक बक्षेका/२/सभा/कावि/ २०८ /२०१६ दिनांक ९/५/२०१६ अन्वये ठरावाची प्रत पत्रासोबत जोडून पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेले आहे.

परंतु सन्मा.सदस्य सौ.झामाबाई बारणे, श्री.निलेश बारणे, सौ.विमलताई जगताप, श्री.संपत पवार व स्विकृत सदस्य श्री.गोरक्ष पाषाणकर यांनी मा.आयुक्त यांना दिनांक १७/५/२०१६ रोजीचे अर्जानुसार मा.प्रभाग समितीने वरीलप्रमाणे तीन्हीही क्रमांकांचे केलेले मंजूर ठराव रदद करुन प्रभाग क्र.५१ बेलठिकानगरमधील लक्ष्मणनगर येथील (गुजरनगर / गणेशनगर) सबवेस गुजरनगर असे नांव देणेबाबत मान्यता मिळावी व तसा ठराव मंजूर होणेकामी आणि मा.प्रभाग समितीमध्ये गुजरनगर सबवे या नावाचा ठराव मंजूर होईपर्यंत किंवा मा.ब प्रभाग समितीमध्ये योग्य तो निर्णय होईपर्यंत मा.ब प्रभाग समिती ठराव क्र.९, दिनांक १७/६/२०१५ रोजीच्या ठरावाची तोपर्यंत अंमलबजावणी न करता स्थगिती दयावी . सदर प्रस्तावावर सांगोपांग चर्चा होवून ,हात वर करुन मतदान घेण्यात आले. सदर मतदानात ठरावाच्या बाजूने ९ मते व ठरावाच्या विरुध्द १ मत पडले. त्यानुसार मा.अध्यक्ष यांनी मा.ब प्रभाग समितीमध्ये यासंबंधी पुर्वी मंजूर केलेले ठराव रदद करुन, प्रभाग क्र.५१ बेलठिकानगरमधील लक्ष्मणनगर येथील (गुजरनगर / गणेशनगर) सबवेस गुजरनगर असे नांव देणेकामीचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला असल्याचे प्रकट केले. त्याप्रमाणे सर्वानुमते सदरच्या ठरावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १२ विषय क्र. ४
दिनांक ७/६/२०१६ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.अनंत को-हाळे अनुमोदक: मा संपत पवार

संदर्भ :- मा.अनंत को-हाळे यांचा दिनांक ७/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव ..

श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकातून तालेरा हॉस्पीटलकडे जाणा-या रस्त्यावर सात गल्ल्या असून, त्या गल्ल्यांना गल्ली क्र.१, गल्ली क्र.२ या पध्दतीने क्रमांक देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला..

ठराव क्र. १३ विषय क्र. ५
दिनांक ७/६/२०१६ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.विमल जगताप अनुमोदक: मा संपत पवार

संदर्भ :- मा.विमलताई जगताप यांचा दिनांक ७/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव ..

औध – रावेत बीआरटी मार्गावरील काळेवाडी फाटा येथील नानासाहेब धर्माधिकारी पुलाखाली दैनंदिन व्यवहारासाठी नागरीकांची खुप वर्दळ चालु असते. परंतु सदर ठिकाणी मुतारीची गैरसोय असून, नागरीकांच्या सोयीसाठी सदर पुलाखाली स्त्रीया व पुरुषासाठी स्वच्छतागृह / मुतारी बांधणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १४ विषय क्र. ६
दिनांक ७/६/२०१६ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.अश्विनी चिंचवडेपाटील अनुमोदक: मा स्वाती कलाटे

संदर्भ :- मा.अश्विनी चिंचवडेपाटील यांचा दिनांक ७/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव .

चिंचवड श्री मोरया गोसावी मंदिरालगत पर्यटन विकास आराखडा अंतर्गत सुशोभीकरणाचे काम सुरु आहे व ते अंतिम टप्यामध्ये आहे. याठिकाणी रस्त्यामध्ये दोन स्वच्छतागृहे (दोन मुतारी फायबर) आहेत त्यांची दुर्गंधी मुळे रस्त्यांना ये जा करणा-यांना त्रास सहन करावा लागतो. नागरीकांच्या तक्रारी देखील आहेत. तरी मुतारी काढून टाकून त्या शेजारील पंपिंग स्टेशन येथे स्थलांतरीत करुन आवश्यकतेनुसार महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहे बांधण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १५ विषय क्र. ७
दिनांक ७/६/२०१६ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.अश्विनी चिंचवडेपाटील अनुमोदक: मा स्वाती कलाटे

संदर्भ :- मा.अश्विनी चिंचवडेपाटील यांचा दिनांक ७/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा चिंचवड येथे संगित वर्ग चिंचवड शाखा या नावाने शास्त्रोक्त गायन हर्मोनियम व तबला यांचा वर्ग चालतो तरी या संगीत वर्गास पंडीत पदमाकर कुलकर्णी संगीत वर्ग चिंचवड असे नांव देण्यात यावे व अशी मागणी संगीत व कला क्षेत्रातील अभ्यासक व मान्यवरांची आहे. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १६ विषय क्र. ८
दिनांक ७/६/२०१६ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.शमीम पठाण अनुमोदक: मा सौ.अश्विनी चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा.शमीम पठाण यांचा दिनांक ७/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव

दि.१६/३/२०१६ रोजी ठराव क्रमांक ९२, मध्ये चिंचवडेनगर येथील दगडोबा चौकाच्या पुढील व संकल्प गार्डन चौकाच्या खालील बाजुस कै.तुकाराम बाळाजी चिंचवडेनगर (पाटील) चौक असे नामकरणाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर ठरावात कै.तुकाराम बाळाजी चिंचवडे (पाटील) ऐवजी कै.तुकाराम बाळाजी चिंचवडे (पोलीस पाटील) अशी दुरुस्ती करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १७ विषय क्र. ९
दिनांक ७/६/२०१६ विभाग – १. नगररचना व विकास विभाग
२. पा.पु. व जलनिसारण विभाग
सुचक : मा.स्वाती कलाटे अनुमोदक: मा अश्विनी चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा.स्वाती कलाटे यांचा दिनांक ७/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड शहरात अतिशय मोजके STP प्लॉन्ट कार्यान्वित आहेत. वाकड आणि आजुबाजुच्या भागात एकही STP प्लॉन्ट नाही. सदयस्थितीला थेरगांव, ताथवडे, वाकड या भागातील सर्व सांडपाणी प्रभागातील मुळा नदीत सोडले जाते. त्यामुळे प्रदुषाचाही धोका उदभवतो आहे. मुळा नदी वाकड गावापासून औंध पर्यंत सध्यातरी तिचे नैसर्गिक सौदर्य जपुन आहे. वाकड प्रभाग हा क्षेत्रफळाने मोठा असून येणा-या काळात त्याची लोकसंख्याही झपाटयाने वाढत जाणार आहे. हया सर्व बाबींचा विचार करुन आम्ही आमच्या कुटूंबातील सर्व्हे नं.२६५/२/३/४ मधील १ एकर ४ गुंठे जागा नदी किनारी उपलब्ध करुन देण्यास तयार आहोत व या जागेवर STP प्लॉन्ट उभा करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १८ विषय क्र. १०
दिनांक ७/६/२०१६ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.शमीम पठाण अनुमोदक: मा झामाबाई बारणे

संदर्भ :- मा.शमीम पठाण यांचा दिनांक ७/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २१ मधील अन्नपुर्णा हॉटेल ते चाफेकर चौकाकडे जाणा-या रस्त्यास साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे मार्ग असे नामकरण करणेस तसेच सदर नावाचा बोर्ड अन्नपुर्णा हॉटेलच्या जवळ लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ २८२ /२०१६.
दिनांक : ११ / ०७ /२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना